दैनिक हेराल्ड | गोवा | शुक्रवार, ३० मे २०२५ | 3

## निवडक

### बेपत्ता झालेल्या महिला व मुलांच्या शोधासाठी विशेष पथकाची स्थापना

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २९ :** दक्षिण गोव्यात २020 पासून बेपत्ता झालेल्या अंदाजे ४७ महिला आणि मुलांचा शोध घेण्यासाठी विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकाचे नेतृत्व एका महिला पोलिस निरीक्षकाकडे देण्यात आले असून त्यामध्ये इतर महिला उपनिरीक्षकांचाही समावेश आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सध्या सर्वाधिक बेपत्ता प्रकरणे वास्को येथून नोंदवण्यात आली आहेत. वास्कोमधून १२ महिला व मुले बेपत्ता असून, त्यानंतर वेर्णा (८), मडगाव (६), मायना- कुडतरी (८), फातोर्डा (६), कुंकळ्ळी आणि म्हार्दोळ (प्रत्येकी १) अशा प्रमाणात बेपत्ता प्रकरणे नोंदवली गेली आहेत. फोंडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतही ८ व्यक्ती बेपत्ता आहेत. सांगे , कुडचडे , केपे आणि काणकोण या पोलिस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रातून कोणतीही बेपत्ता प्रकरणे समोर आलेली नाहीत. या प्रकरणांच्या तपासासाठी प्रत्येक पोलिस ठाण्याच्या पातळीवर स्वतंत्र शोध पथके स्थापन करण्यात आली आहेत. दक्षिण गोव्याचे पोलिस अधीक्षक, आयपीएस टिकम सिंग वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत या उपक्रमावर विशेष भर देण्यात आला.

एसपी वर्मा यांनी संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले असून, प्रत्येक प्रकरणाचा तार्किक शेवटपर्यंत पाठपुरावा करण्याचा आदेश दिला आहे. संबंधित महिला पोलिस अधिकाऱ्यांना विविध महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामध्ये पीडितेचे मूळ गाव आणि सध्याचे ठिकाण शोधणे, गोव्यात येण्यामागील कारणे जाणून घेणे, तसेच ती विवाहित असल्यास वैवाहिक आयुष्यातील समस्यांचा शोध घेणे या बाबींचा समावेश आहे.

तपास करताना तपास अधिकाऱ्यांना कुटुंबीयांशी संवाद साधण्याबरोबरच प्रेमसंबंध, पळून जाणे, मानवी तस्करी, तसेच गोवा आणि शेजारच्या राज्यांतील अज्ञात मृतदेहांची छाननी करणे, मानसिक आश्रयगृहे आणि अपना घर'सारख्या संस्थांची पडताळणी करणे यांसारख्या अनेक शक्यतांचा विचार करावा लागत आहे.

एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याच्या माहितीनुसार, एखादी व्यक्ती बेपत्ता झाल्यानंतर तपासाच्या सुरुवातीस तिच्या गायब होण्यामागील नेमका उद्देश स्पष्ट नसतो. मात्र, ती व्यक्ती सापडल्यानंतर तपास अधिकाऱ्यांना तिच्या जबाबातून अनेक महत्त्वाच्या बाबी समजतात.

कौटुंबिक वादांमुळे घर सोडलेल्या महिलांच्या बाबतीत, त्या घरी परतण्यास नकार दिल्यास त्यांना स्वतःचा निर्णय घेण्याची मुभा देण्यात येते. दुसरीकडे, अल्पवयीन मुलांच्या प्रकरणांमध्ये पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून, या संदर्भात प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) नोंदवण्यात आले आहेत, अशी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

# रावणफोंड आरओबी : कंत्राटदार व सल्लागारांविरोधात तक्रार दाखल

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २९ :** रावणफोंड येथील सहा-पदरी ओव्हर ब्रिज (आरओबी) प्रकल्पाच्या अत्यंत संथ प्रगतीमुळे आणि निष्काळजीपणामुळे सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर या प्रकल्पाशी संबंधित कंत्राटदार आणि सल्लागार कंपनीविरोधात मडगाव टाउन पोलिस ठाण्यात फौजदारी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

गोवा राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या कामकाजात सहभाग असलेल्या मेसर्स एम.एस. खुराणा इंजिनिअरिंग लिमिटेड (कंत्राटदार) व मेसर्स श्रीखंडे कन्सल्टंट्स प्रायव्हेट लिमिटेड (सल्लागार) यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हे दाखल करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार संबंधित कंपन्यांवर बीएनएस कलम २९० (गुन्हेगारी निष्काळजीपणा), ३२४ (गैरव्यवहार), ३१६ (गुन्हेगारी विश्वासघात) आणि ६१ (गुन्हेगारी कट रचना) अंतर्गत आरोप ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे.



प्रकल्पाची सुरुवात डिसेंबर २०२२ मध्ये झाली असून, आजतागायत केवळ १० टक्केच कामाची प्रगती झाली आहे, असा तक्रारदारांचा दावा आहे. प्रकल्प पूर्ण होण्याची अंतिम मुदत २२ डिसेंबर २०२४ आहे. मात्र, पावसाळ्याच्या तोंडावरही आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात अपयश आल्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर धूप झाली आहे, रस्त्याला भेगा पडल्या आहेत आणि वाहतूक अंशतः वळवावी लागली आहे.

ही बाब केवळ तांत्रिक दुर्लक्षाची नसून स्पष्टपणे गुन्हेगारी निष्काळजीपणाचे उदाहरण आहे, असे मत माजी नगरसेवक आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्ते सॅव्हियो कुतिन्हो यांनी व्यक्त केले. या विलंबामुळे केवळ वाहतुकीचा खोळंबा होत नाही, तर शासनाचा आर्थिक नुकसानही होत आहे. शिवाय, सार्वजनिक सुरक्षेला सरळ सरळ धोका पोहोचवला जात आहे. कंत्राटदार आणि सल्लागारांविरोधात तात्काळ एफआयआर दाखल व्हावा, अशी मागणी त्यांनी केली.

तक्रारीत आणखी एका गंभीर मुद्द्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. कामात जाणूनबुजून विलंब करून कंत्राटातील एस्केलेशन क्लॉज' लागू करण्याचा प्रयत्न केला जात असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या क्लॉजनुसार प्रकल्पाचा खर्च वाढवता येतो आणि त्यामुळे सरकारी तिजोरीवर अधिकचा बोजा पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

धूपग्रस्त ॲप्रोच रोड आणि अपूर्ण आरओबीमुळे मडगाव शहरात वाहतुकीचे चित्र गंभीर बनले आहे. काही रस्ते बंद करावे लागले असून, पर्यायी मार्गांवर मोठी वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी अतिरिक्त पोलीस तैनात करण्यात आले आहेत.तक्रारदारांनी पोलिस प्रशासनाला या प्रकरणाची तात्काळ दखल घेण्याची विनंती केली असून, संबंधित जबाबदार कंपन्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## धोकादायक इमारतीवर कारवाई नसल्याने नागरिकांत भीती

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २९ :** शहरातील अनेक इमारती सुरक्षिततेच्या निकषांवर खऱ्या अर्थाने उभ्या राहत नसल्याच्या चिंतेमुळे नागरिकांत संभ्रम आणि चिंता वाढत आहे. विशेषतः या इमारतींमधून चालणाऱ्या व्यवसायांना मडगाव नगरपरिषदेने (एमएमसी) अद्याप व्यावसायिक परवाने देत राहिल्याने स्थानिकांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेवर प्रश्न उपस्थित केला आहे.

नागरिकांच्या एका गटाने मडगाव नगरपरिषदेच्या या बाबतीत कर्तव्यदक्षतेवर गंभीर शंका व्यक्त केली असून, असुरक्षित इमारतींमधून व्यवसाय सुरू असताना नागरी संस्था या बाबतीत का डोळेझाक करते? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. या गटाचे म्हणणे आहे की, अशा परिस्थितीत प्रशासनाने संबंधित व्यावसायिकांना परिसर रिकामा करण्याचे आदेश द्यावे, परंतु अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

एमएमसीच्या अधिकाऱ्यांनी या मुद्यावर भाष्य करताना काही व्यवसाय खरोखरच असुरक्षित इमारतीत चालत असल्याची कबुली दिली असून, त्याविरोधात लवकरच कारवाई होईल असे संकेत दिले आहेत. मात्र, इमारतींची संरचनात्मक पुनर्पडताळणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आणि अहवाल सादर होईपर्यंत व्यावसायिक परवाने रद्द करण्याच्या निर्णयात विलंब होत असल्याचे स्पष्ट झाले.

सध्या एमएमसी आणि मामलतदार कार्यालयाच्या संयुक्त पथकाद्वारे या इमारतींच्या स्थितीचे तपशीलवार मूल्यांकन सुरू आहे. गेल्या तीन दिवसांत अनेक इमारतींची पुनः तपासणी करण्यात आली असून, संबंधित व्यावसायिक आस्थापनांचे नोंदी संकलित केल्या जात आहेत.

विशेष माहितीप्रमाणे, सध्या जवळजवळ २५-३० व्यावसायिक संस्था अशा पूर्वी असुरक्षित म्हणून ओळखलेल्या इमारतींमधून कार्यरत आहेत. अनेक व्यावसायिकांना जोखीम माहिती असूनही ते व्यवसाय सुरू ठेवत आहेत, त्यामागे घरमालक व भाडेकरू यांच्यातील वादही एक कारण म्हणून सांगितले जात आहे.

अलीकडील दोन इमारतींचे अर्धवट कोसळण्याचे प्रकार या विषयाला पुन्हा चर्चेत आणले असून, यामुळे प्रशासनावर दबाव वाढला आहे.

एमएमसीचे अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेतली असून, असुरक्षित इमारतीत कार्यरत व्यावसायिकांचे परवाने रद्द करण्याचा विचार निश्चितपणे चालू आहे. पुनर्पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्वरित कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले. त्यांनी आणखी सांगितले की, आतापर्यंत २१ इमारतींना असुरक्षित म्हणून ओळखण्यात आले आहे; मात्र काही मालकांनी त्यांच्या इमारतींची स्थिरता प्रमाणपत्रे सादर केली आहेत.

आता नागरिक आणि स्थानिक भागधारक एमएमसीच्या अंतिम अहवालाची वाट पाहत आहेत, ज्यामुळे भविष्यातील सुरक्षा उपाययोजनांवर प्रकाश पडेल की प्रशासनात सुरक्षिततेसाठी प्राधान्य दिले जाईल की नाही, हे ठरले पाहिजे.

## राज्यात १ जूनपासून वार्षिक मासेमारी बंदी लागू

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २९ :** गोव्यात मासळीच्या साठ्यांचे संरक्षण आणि प्रजनन हंगामाला चालना देण्यासाठी १ जूनपासून वार्षिक मासेमारी बंदी लागू करण्यात येत आहे. ही बंदी ३१ जुलैपर्यंत म्हणजेच दोन महिने कायम राहणार आहे. या कालावधीत यांत्रिक प्रणोदन प्रणालींनी सुसज्ज तसेच पर्स सीन जाळ्यांचा वापर करणाऱ्या नौकांना समुद्रात मासेमारी करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या माहितीनुसार, या कालावधीत गिल जाळ्यांचा वापर करणाऱ्या आणि १० अश्वशक्ती (एचपी) क्षमतेपर्यंतच्या आउटबोर्ड अथवा इनबोर्ड इंजिनने सुसज्ज असलेल्या नोंदणीकृत मोटारीकृत कॅनो बोटी मासेमारीसाठी वापरण्यास मुभा दिली आहे. बंदीची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील सर्व महत्त्वाच्या जेट्टी सील करण्यात आल्या आहेत. तसेच कोणतेही उल्लंघन होऊ नये म्हणून देखरेखीसाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. या कालावधीत जेट्टींवर इंधन, बर्फ वा इतर कोणत्याही आवश्यक साधनसामुग्रीचा पुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.



ऑल गोवा बोट ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष जोस फिलिप डिसोझा यांनी सांगितले की, या बंदीच्या काळात बहुतेक नौकांची देखभाल व दुरुस्ती केली जाते. आम्ही वर्षातील दहा महिने मासेमारी करतो, आणि उर्वरित दोन महिने बोटींच्या देखभालीसाठी राखून ठेवतो. यंदाचा हंगाम फारसा समाधानकारक नव्हता. सरासरी १०० बोटींमधून केवळ ३० बोटींना काहीसा नफा झाला, उर्वरित बोटींना खर्चही भरून निघाला नाही, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी बोटीवरील कर्मचाऱ्यांच्या अडचणींकडेही लक्ष वेधले. आमच्या बऱ्याचशा क्रू सदस्यांची भरती ओडिशा आणि झारखंडमधून होते. ते मासेमारीच्या हंगामात येथे येतात आणि विक्रीच्या आधारे कमिशन मिळवतात. सध्या समुद्र खवळलेला असल्यामुळे गेले दहा दिवस एकही बोट बाहेर पडलेली नाही. परिणामी, बऱ्याच क्रू सदस्यांनी घरी परतण्याचा निर्णय घेतला आहे, असेही डिसोझा यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, 'गोयच्या रापोणकरांचो एकवोट' या संस्थेचे ओलेन्सियो सिमोस यांनी ही बंदी अधिक प्रभावी व्हावी यासाठी ती ९० दिवसांपर्यंत वाढवण्याची मागणी केली आहे. गुजरातमध्ये ७६ दिवसांची मासेमारी बंदी असते. गोव्यात ती कालमर्यादा वाढवायला हवी, असे त्यांनी मत्स्यव्यवसाय मंत्री आणि संचालक यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे. एलईडी लाईट्सचा वापर, बुल ट्रॉलिंग आणि जोडी ट्रॉलिंग यांसारख्या विध्वंसक पद्धतींवर तातडीने बंदी घालणे आवश्यक आहे. यासाठी मी तटरक्षक दल, तटीय पोलिस आणि मत्स्यव्यवसाय विभागाला पत्र पाठवले आहे. ५८ सदस्यांचे स्वतंत्र अंमलबजावणी पथक तयार करून या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच, एलईडी लाइटिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व जनरेटरवरही बंदी घालण्याची गरज सिमोस यांनी व्यक्त केली.

## पाकिस्तानात गेलेल्या नागपूरच्या महिलेचे गूढ वाढले

### तपास यंत्रणा सतर्क | हेरगिरीच्या अंगाने होणार तपास

**नागपूर, दि. २९ :**

या महिन्याच्या सुरुवातीला अचानक बेपत्ता झालेल्या आणि पाकिस्तानच्या ताब्यात गेलेल्या नागपूरच्या महिलेची अखेर सुखरूप परतफेर करण्यात आली आहे. सुनिता जामगडे (वय ४३) या महिलेला कारगिलमधील नियंत्रण रेषा पार करून पाकिस्तानात गेल्याचे स्पष्ट झाल्यानंतर भारतीय यंत्रणांनी सतर्कता बाळगून परस्पर राजनैतिक समन्वयानंतर तिला वाघा सीमेवर भारताकडे सोपवण्यात आले.

जामगडे नागपूरमधील कपिलनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील संत कबीर नगर येथील रहिवासी असून, १४ मे रोजी तिच्या बेपत्ताची नोंद पोलिसांकडे करण्यात आली होती. १२ वर्षीय मुलाला घरी एकटं सोडून ती बेपत्ता झाल्याने तिच्या कुटुंबीयांनी चिंता व्यक्त केली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, जामगडे हिने मुलासह अमृतसरला जात असल्याचं कुटुंबीयांना सांगितलं होतं. मात्र, ती थेट कारगिलमध्ये गेली आणि स्थानिक हॉटेलमध्ये मुलासह थांबली. काही वेळाने मुलाला एकटं सोडून ती अचानक निघून गेली. हॉटेल व्यवस्थापनाने कारगिल



पोलिसांना याची माहिती दिल्यानंतर चौकशी सुरू झाली. तिच्या ओळखीची पुष्टी आधार कार्डावरून करण्यात आली.

पोलिसांनी तपास सुरू केला असता, ही महिला कारगिलजवळील हंदरमन गावातून नियंत्रण रेषा ओलांडून पाकिस्तानात गेल्याची माहिती पुढे आली. पाकिस्तानात गेल्यानंतर ती तिथल्या सैन्याच्या ताब्यात होती. भारतीय गुप्तचर यंत्रणांना याची माहिती मिळताच, बॅकचॅनल संवाद आणि सीमावर्ती अधिकाऱ्यांच्या समन्वयानंतर तिला भारतात परत आणण्यात यश आलं.

पोलिस तपासात असंही समोर आलं की, एप्रिल महिन्यातही जामगडे हिने वाघा-अटारी सीमेवरून पाकिस्तानात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, अमृतसर पोलिसांनी तिला वेळीच ताब्यात घेतले होते. त्यावेळीही तिचा कारगिलमार्गे पाकिस्तानात जाण्याचा उद्देश होता. पहिला प्रयत्न फसल्यावर ती पुन्हा कारगिलमार्गे पाकिस्तानात शिरली आणि यशस्वी झाली.

जामगडेच्या या हालचालींमुळे सुरक्षा यंत्रणांमध्ये खळबळ उडाली आहे. नागपूर पोलिसांचे चार सदस्यांचे विशेष पथक अमृतसरला पाठवण्यात आले होते. तिला अमृतसर पोलिसांकडून ताब्यात घेऊन मंगळवारी रात्री दिल्लीमार्गे नागपूरला आणण्यात आलं. बुधवारी उशिरा ती नागपूरला पोहोचली.

पोलिसांकडून तिची चौकशी सुरू असून, ती स्वतःहून सीमारेषा पार केली की कोणाच्या प्रभावाखाली हा प्रकार घडला, याचा शोध घेतला जात आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, जुल्फेकर' आणि पास्तर' या दोन व्यक्ती तिच्या संपर्कात होत्या. या प्रकरणात त्यांची भूमिकाही तपासली जात आहे.

तपास यंत्रणांनी तिचा मोबाइल तपासला असता, त्यात पाकिस्तानातील एका नागरिकासोबत चॅटिंग झाल्याचे आढळले आहे. त्यामुळे हेरगिरीसारख्या गंभीर शक्यताही नाकारता येत नाहीत. तिच्या कॉल रेकॉर्ड्स, सोशल मीडिया वापर आणि प्रवासाची पद्धत यावर सखोल तपास सुरू आहे.

तसेच, तिच्याकडे भारताच्या दृष्टीने संवेदनशील माहिती होती का, आणि तिने ती पाकिस्तानला दिली का, याची चौकशी करत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

नागपूर पोलिस तपास पूर्ण झाल्यानंतर कारगिल पोलिसांकडूनही तिची चौकशी केली जाणार आहे. संबंधित महिला पूर्वी नागपूरमधील एका खासगी रुग्णालयात परिचारिका म्हणून कार्यरत होती आणि आईसोबत राहत होती.

या घटनेने स्थानिक पातळीपासून केंद्र सरकारपर्यंतची यंत्रणा सतर्क झाली आहे. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे की, ही गंभीर बाब असून कोणत्याही संबंधित व्यक्तीला सोडले जाणार नाही.

## विकासकाला ११% व्याज आणि ६ लाखांचा दंड

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २९ :** गोवा रिअल इस्टेट रेग्युलेटरी अथॉरिटी (रेरा) ने बिल्डरविरोधात महत्त्वाचा निर्णय देत खरेदीदाराच्या नावे विक्री करार करण्याचे तसेच रो हाऊससाठी जमा केलेल्या ९० लाख रुपयांवर ११ टक्के व्याज देण्याचे निर्देश दिले आहेत. हे आदेश रेरा सदस्य विन्सेंट डिसिल्वा यांनी दिले.

विकसकाने रेरा कायद्याच्या कलम १७ आणि १८ चे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर, कायद्याच्या कलम ६१ अंतर्गत रेरा प्राधिकरणाने विकासकाला ५ लाख रुपयांचा दंड आणि तक्रारदाराच्या न्यायालयीन खर्चासाठी १ लाख रुपये देण्याचे निर्देशही दिले आहेत.

विकसकाने हा निर्णय मिळाल्यानंतर ६० दिवसांच्या आत त्याची अंमलबजावणी करून अनुपालन अहवाल सादर करणे बंधनकारक केले आहे. अन्यथा, प्राधिकरण रेरा कायद्यानुसार कायदेशीर कारवाई हाती घेईल, असा इशारा देखील यावेळी देण्यात आला आहे. ही कारवाई बेंगळुरू येथील लक्ष्मणसंद्रा वासुदेवमूर्ती रवी यांच्या तक्रारीनंतर करण्यात आली. त्यांनी सालसेट तालुक्यातील वरका येथे एक रो हाऊस खरेदी करण्यासाठी विकासकासोबत करार केला होता. यासाठी त्यांनी एकूण ९० लाख रुपये आणि अतिरिक्त कामांसाठी २.६१ लाख रुपये भरले होते. मात्र, विकासकाने करारनाम्यावर सही न करता प्रकल्पाचे वेळेवर हस्तांतरण केले नाही, असा आरोप तक्रारदाराने केला.

तक्रारात असेही नमूद करण्यात आले की, विकासकाने निकृष्ट दर्जाचा संपर्क रस्ता बांधला असून, प्रकल्पाची नोंदणी गोवा रेरा प्राधिकरणाकडे न करता नियमभंग केला आहे.

यास प्रत्युत्तर देताना, प्रतिवादी विकासकाने सांगितले की, ३ ऑक्टोबर २०१९ रोजी फेज खख मधील रो हाऊससाठी विक्री करार करण्यात आला होता. नोव्हेंबर २०१९ मध्ये खरेदीदाराने फिट-आउटसाठी ताबा घेतला होता आणि २२ डिसेंबर २०२१ रोजी त्यांनी तात्पुरत्या परवानगीसाठी करार केला होता, असा दावा करण्यात आला.

विकसकाने पुढे असेही युक्तिवाद मांडले की, सदनिकाधारकांच्या संमतीने सोसायटी स्थापन करण्यात आली असून, त्यामुळे वैयक्तिक विक्री करार करता येत नाही. कन्व्हेयन्स डीड सोसायटीच्या नावे करण्याची प्रक्रिया सुरु असून, काही सदनिकाधारकांच्या सहकार्याचा अभाव असल्याने ती प्रलंबित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, प्रकल्पाची नोंदणी २०१८ मध्येच गोवा रेराकडे झाल्याचा दावा करत खरेदीदाराने केलेल्या विलंब व व्याजासंबंधीच्या मागण्या निराधार असल्याचेही त्यांनी म्हटले.मात्र, रेरा प्राधिकरणाने सर्व बाजूंचा विचार करून खरेदीदाराच्या बाजूने निर्णय दिला आहे.